ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 10 | ISSUE - 5 | JANUARY - 2024

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# कल्याणच्या नेतिवली टेकडीवरील एक अपरिचित लेणी स्थापत्य



रोहित राजेंद्र भोसले
कल्याण

**उद्देश:-**

सदर शोधनिबंधाचा उद्देश कल्याण येथील नेतीवलीजवळ भोई (होम बाबा) टेकडीवरील एका अपरिचित लेणीचे स्थाननिश्चिती करून या लेणीस्थापत्याचा विस्तृत अभ्यास करणे हा आहे. दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी उपरोक्त लेखकासह, विवेक वाघमारे व अर्जुन काटे यांनी वरील टेकडीला भेट दिली असता सदर लेणी दृष्टीस पडली.

**प्रस्तावना :-**

कल्याण (अक्षांश १९°१४’३२ उ.,रेखांश ७३°७’१२ पू.) हे महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयातील एक महत्वाचे शहर तसेच प्राचीन बंदर आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या सुरुवातीला मोसमी वाऱ्याचा शोध लागला[1] आणि पाश्चिमात्य देशांशी चालणाऱ्या व्यापारात वाढ झाली. यासाठी भारताच्या पश्चिम किनारी प्रदेशात व्यापारी मार्गाच्या मुख्य ठिकाणी बंदरे तसेच व्यापारी बाजारपेठांची निर्मिती झाली. यात भरूच, सोपारा, कल्याण, चौल यांनी देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये महत्वाची भूमिका बजावली होती. कल्याणची भौगोलिक रचना पाहिली असता ते अरबी समुद्रापासून २२ मैल आतमध्ये उल्हास नदीकाठी खाडीकिनारी वसलेले असून हीच उल्हास नदी पुढे वसईखाडीमार्गे अरबी समुद्रास जाऊन मिळते. पेरिप्लसच्या मते; ईसवी सनाच्या पहिल्या शतकात प्रथम सातकर्णीच्या काळात कल्याण कायदेशीर बाजारपेठेचे केंद्र होते. परंतू; ते नहपानाच्या ताब्यात आल्यावर त्याने येथील व्यापारास प्रतिबंध केला व येथे उतरणारी ग्रीक जहाजे पहारेकऱ्यांच्या देखरेखेखाली भरुच येथे नेण्यात येत असत.[2] प्राचीन काळात कल्याणचा जुन्नरशी घनिष्ट संबंध असलेला दिसून येतो. या कल्याण बंदरावर उतरणारा व्यापारी माल लमाणांच्या साह्याने नाणेघाटमार्गे सातवाहनांची राजधानी जुन्नर येथे पोहोचवला जात. जुन्नरच्या एका पेठेचे नावदेखील कल्याणवरुन आहे. कान्हेरी लेणी येथील बारा व जुन्नर येथील दोन शिलालेखात कल्याणच्या व्यापाऱ्यांनी दिलेल्या दानांचा उल्लेख सापडतो. उदा. कल्याणच्या सुवर्णकार स्वामिदत्ताचे पाण्याचे कुंडाचे, कल्याणचा व्यापारी चित्त याचा पुत्र पुनवसु याचे पाण्याच्या कुंडाचे दान, कल्याण येथील अंबालिका विहार येथील दान, गौतमीपुत्र सातकर्णी काळात आनंदपुत्र उपासक अपरेणु याने चतूर्दिशेच्यां भिक्खूसंघासाठी दिलेले लेणे व मंडपाचे दान, कल्याणच्या नंद नामक लोहाराचे दान ई. यावरून; सोपारा – कल्याण - नाणेघाटमार्गे जुन्नर येथे जाणारा प्राचीन व्यापारी मार्ग कान्हेरी लेणी येथून जात होता हे लक्षात

येते. कॉसमॉस इंडिकोप्लूस्टेस यांच्यामते; इसवी सनाच्या सहाव्या शतकात कांस्यकाम, शिसम तसेच कापड यांसाठी प्रसिद्ध असलेल्या भारतातील सहा मोठ्या बाजारपेठांमध्ये कल्याणचा समावेश होता. शिसमचा बहुतांश व्यापार कल्याणमार्गे चालत असे. पर्शिया हा मुख्य देश होता ज्यातून बहुतेक सीसम लाकूड आयात केले जात असे. पर्शियानंतर पुढचा देश होमराइट प्रदेश अर्थात दक्षिण अरेबिया होता ज्याला कल्याणमधून शिसम मोठ्या प्रमाणावर निर्यात केले जात.[3] अगदी प्राचीन ते मध्ययुगीन काळापर्यंत आपल्या भौगलिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थानामुळे कल्याण बंदराशी देश विदेशातील व्यापारी यांचा संबंध येत होता. कल्याणजवळील लोनाड गावाच्या उत्तरेला इसवी सनाच्या सहाव्या-सातव्या शतकातील अप्रतिम बौद्ध लेणे तसेच दक्षिणेला बाराव्या शतकातील शिलाहारकालीन शिव (लवणादित्य) मंदिर आहे.[4] कल्याणच्या याच बंदरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या आरमाराची कोनशिला दुर्गाडी किल्ल्याच्या स्वरूपात रचली.




**नकाशा १**




**नकाशा २**

उल्हास नदी उत्तरेकडून वळसा घेत दक्षिणेला जिथे खाडीत विलीन होते, अशा ठिकाणी कल्याण बंदराजवळ रेल्वे मार्गाच्या दक्षिणेला सद्यःस्थितीत दोन टेकड्या आहेत. (**नकाशा १**) यातील एक पत्रीपुलाजवळ नेतिवली येथे भोई टेकडी असून त्यावर सर्वोच्च ठिकाणी अंदाजे ३०० वर्षापूर्वीच्या एका सुफी (अरब) संत होम बाबा व त्यांच्या शिष्यांची मजारी आहेत. यामुळे या टेकडीला होम बाबा टेकडी नावाने सुध्दा ओळखतात. या टेकडीच्या पश्चिम-दक्षिण उतारावर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे जलशुदधीकरण केंद्र आहे. तर दुसरी कचोरे गावाला लागून महादेव टेकडी आहे. सद्यःस्थितीत एकमेकांपासून वेगवेगळया दिसणाऱ्या ह्या दोन टेकड्या प्राचीनकाळी एकच मोठे संयुक्त टेकाड असले पाहिजे. सुरूवातीच्या कालखंडातील व्यापारी बाजारपेठेचे महत्त्वाचे केंद्र असलेल्या कल्याण बंदराजवळ असलेल्या या टेकडीवर बौद्ध भिक्खूंची

नजर गेली नसेल, असे शक्य नाही. रेल्वेमार्गाचे विस्तारीकरणात प्रथमतः टेकड्यांना सुरुंग लागला असावा. तसेच, भूभक्षी मानवाच्या हस्तक्षेपामुळे या टेकडीच्या मध्यापर्यंत आजूबाजूला झोपड्यांचा विळखा पडला आहे. तसेच, खाणकामामुळे महादेव टेकडी नष्ट होत असून येथील बहुतांश पुरावषेश नष्ट झाले आहेत. आजही दोन्ही टेकड्यांच्या सर्वात उंच ठिकाणाहून समोरील खाडीप्रदेश तसेच कल्याणच्या आसपासच्या प्रदेशाचे विहंगम दृश्य दिसते. १८८२ मध्ये भगवानलाल इंद्रजी यांनी कल्याण शहरातील सदरील दोन टेकडींवर विटांच्या भिंतींचे अवशेष, स्तूपाचे उंचवटे तसेच काही कातळकोरीव लेण्यांची नोंद केली आहे.[5] यांपैकीच कदाचित एक लेणे कल्याण प्राचिन बंदरांचा अभ्यास करायला आम्ही गेलो असता आमच्या दृष्टीस पडले. लेणीसंबंधी अधिक माहिती घेतली असता वरील नोंद सोडली तर विस्तृत माहिती उपलब्ध नाही. सदर लेणीचे स्थाननिश्चिती करून त्या लेणीस्थापत्याचे कालखंडानुसार शक्यतेचे विस्तृत विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## लेणीचे स्थाननिश्चिती व वर्णन :-

GPS Coordinates - Lat 19º 13'41" N, Long 73º07'07" E

वर उल्लेख केल्याप्रमाणे सदर लेणी पश्चिमाभिमुख स्थित आहे. लेणीच्या समोर उल्हास नदीचा पश्चिमेकडील वळणदार प्रवाह दिसतो. सदरील लेणी आतील बाजूने काहीशी अंतर्वक्र आहे. या लेणीस्थापत्याची लांबी ११ फूट, रुंदी ९ फूट तसेच उंची ५.६ फूट आहे. मागील भिंतीपासून पुढे दोन फूट दगडी बाक कोरण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. तसेच; मागील भिंतीत मध्यभागी खोबणी दिसून येते या खोबणीच्या डाव्या बाजूला एक पुरूषाचे चित्र तैलरंगाने रंगवलेले आहे. लेणीच्या वरील बाजूच्या उतारावरून पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह वाहतो. यामुळे लेणीच्या आतील बाजूस मागील तसेच उजव्या भिंतीत भेगा पडल्या आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस आतील बाजूने दारकससाठी काटकोनात अंतर्वक्र रचना दिसते. डाव्या बाजूच्या भिंतीवर काही ठिकाणी मातीच्या गिलाव्याचे (प्राचीन?) काम दिसते. लेणीच्या दर्शनी भागात प्रवेशाच्या वरील बाजुस मुळ दगडाला चर खोदले असून मध्यभागी पिंपळपानी अपूर्ण आकार दिसून येतो. लेणीच्या माथ्यावरील छत सपाट असून त्यावर पुढील दिशेस मध्यभागी एक खोबणी (५ इंच) आहे. लेणीच्या आतील बाजूस अलीकडच्या काळात केलेले रंगकाम दिसून येते. या लेणीच्या जवळपास पाण्याचे टाके दिसून येत नसले तरीही लेणीच्या बाहेरील डाव्या बाजूस त्यासंबंधी काम सुरू झाले असावे अशी रचना दिसून येते.

वरील वर्णनावरून सदर लेणीचे कालखंडानुसार दोन भागात वर्गीकरण करता येईल.

I. आतील तीनही बाजूने अपूर्ण राहिलेली बाकाची रचना तसेच बाहेरील बाजूस पाण्याच्या कुंडाचे अपूर्ण काम पाहता प्रथमदर्शनी हे साधे मटप प्रकारातील स्थापत्य दिसते. सुरूवातीच्या काळात याचा उपयोग बहुउद्देशीय कारणासाठी केला जात असावा. कदाचित इसवी सनाच्या पहिल्या शतकात नहपानाने कल्याण बंदरावर प्रतिबंध आणल्याने येथील व्यापार काही काळ ठप्प झाला. यामुळे; कल्याण बंदरात येणाऱ्या व्यापारांनी पर्यायी मार्ग स्वीकारल्यामुळे इथे देणगीअभावी कार्य थांबले असण्याची शक्यता आहे.

II. सदर लेणीच्या दर्शनी भागात प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस केलेले त्रिकोणी चर, पिंपळपानी (चैत्यगवाक्षसदृश?) अपूर्ण रचना, तसेच मागील भिंतीत केलेली खोबणी यांवरून नंतरच्या काळात येथे वज्रयान पंथाचे प्राबल्य असावे. मागील भिंतीतल्या खोबणीचे प्रयोजन चल स्वरूपातील (लाकडी?) वज्रयानी देवता स्थापन करण्यासाठी केली असण्याची शक्यता आहे. हा कालखंड इसवी सनाचे सहावे सातवे शतकाच्या दरम्यानचा असावा. स्थानिकांशी केलेल्या चर्चेतून

असे निदर्शनास आले की; येथे सुमारे ३०० वर्षापूर्वी सूफी संत तसेच सिद्ध साधूंचा या संपूर्ण टेकडीवर वावर असला पाहिजे. यादरम्यान त्यांनी लेणींचा उपयोग वास्तव्यासाठी नक्कीच केला असण्याची शक्यता आहे.

तर अशा महत्वाच्या लेणी स्थापत्यामुळे कल्याणच्या प्राचीन इतिहासात अजून एक मानाचे पान रोवले गेले असून सदर टेकडीवर अजून काही प्राचीन अवशेष आढळून येतात का यावर अधिक संशोधनात्मक कार्य होणे गरजेचे आहे.


## संदर्भसूची:-


1. W. H. Schoff 1912, The Periplus of The Erythraean Sea, Longmans, Green, And Co., Page No.43
2. उपरोक्त
3. Saletore R.N.1973, Early Indian Economic History, Pg. No. 189
4. Gazetteer of the Bombay Presidency, Vol. XIV, Thana, Pg No 212
5. Gazetteer of the Bombay Presidency, Vol. XIV, Thana, Place of Interest, pp 396-399


## छायाचित्र सूची :-


चित्र १ – लेणीचा दर्शनी भाग


चित्र २- उजव्या भागाची अंतर्वक्र रचना


चित्र ३ – लेणीतून दिसणारा उल्हास नदीचा पश्चिम प्रवाह


चित्र ४ – मागील भिंतीत मध्यभागी असणारी खोबण



चित्र ५– भिंतीवरील मातीचा गिलावा



चित्र ६ - लेणीच्या छतावरील खोबणी